साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेनुसार आर्थिक सक्षमतेचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार विभाग

शासन निर्णय क्रमांक :- ससाका-०३२५/प्र.क्र.६७ /२५-स,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २७/०७/२०२६.

वाचा:-

१. साखर आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.साआ/विकास/गाळप क्षमतावाढ धोरण/२८६/२०२३, दि.१४/०७/२०२३.(धोरण अहवाल)
२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. ससाका-०३२५/प्र.क्र.६७/२५-स, दि.२५/०३/२०२५
३. साखर आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.साआ/विकास/ गा.क्ष.वा./कक्ष ११/४६६/२०२६५, दि.२२/०७/२०२५ (अभ्यास गट अहवाल)
४. साखर आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.साआ/विकास/कक्ष-११/गाळप क्षमता वाढ/३८५/२०२६, दि.११/०६/२०२६

प्रस्तावना :

राज्यातील साखर कारखाने आर्थिकदृष्ट्या कार्यक्षमतेने कार्यरत राहण्यासाठी शास्त्रीय, आर्थिक आणि तांत्रिक बाबींचा विचार करून साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतानिहाय (२५०० TCD, २५०० ते ५००० TCD, ५००० ते १०००० TCD व १०००० TCD पेक्षा जास्त) गाळप हंगामात किमान किती दिवस कारखाना चालल्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम राहील, यावर सखोल अभ्यास करून धोरण ठरवण्यासाठी साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेनुसार आर्थिक सक्षमतेचा अभ्यास करण्यासाठी साखर आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली साखर उद्योगातील तज्ज्ञ व्यक्तींची एक विशेष अभ्यास समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

साखर कारखाने आर्थिकदृष्टया कार्यक्षमतेने कार्यरत राहण्यासाठी शास्त्रीय, आर्थिक आणि तांत्रिक बाबींचा विचार करून साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेनिहाय गाळप हंगामात किमान किती दिवस कारखाना चालल्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम राहील, यावर सखोल अभ्यास करून धोरण ठरविण्यासाठी साखर आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे साखर उद्योगातील तज्ज्ञ व्यक्तींची एक विशेष अभ्यास समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव	पदनाम
१	डॉ. संजय कोलते	साखर आयुक्त
२	श्री. शेखर गायकवाड	माजी साखर आयुक्त
३	श्री. संभाजी कडूपाटील	महासंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट,पुणे
४	डॉ. केदारी नारायण जाधव	साखर संचालक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य, पुणे
५	श्री. यशवंत गिरी	साखर संचालक (अर्थ) महाराष्ट्र राज्य, पुणे

६	डॉ. संजय भोसले	माजी साखर संचालक (प्रशासन)
७	श्री. संजय खताळ	व्यवस्थापकीय संचालक, साखर संघ मुंबई
८	श्री. बाळासाहेब बडाख	सहनिबंधक (लेखापरीक्षण)
९	श्री. अजित चौगुले	कार्यकारी संचालक, विस्मा
१०	श्री. मनोहर जोशी	कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी ससाका लि. हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
११	श्री. यशवंत कुलकर्णी	कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग ससाका लि. श्रीपूर, ता. माळशिरस,जिल्हा पुणे
१२	श्री. अविनाश जाधव	कार्यकारी संचालक, सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रिज लि. उजना, ता. अहमदपूर, जि. लातूर
१३	श्री.शैलेश केदारे	तज्ज्ञ व्यक्ती, रा.पुरजाल, औंढा नागनाथ, जि.हिंगोली

वरील समितीने राज्यातील साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेत वाढ करण्याच्या अनुषंगाने राज्यातील ऊस क्षेत्र, ठिबक सिंचन योजना, जलयुक्त शिवार योजना, ऊस शेतीत कृत्रिम बुद्धिमत्ता (A.I.) तंत्रज्ञानाचा वापर, मर्यादित ऊस क्षेत्रात ऊस उपलब्धता वाढीसाठी त्रिसूत्री यांचा अभ्यास करावा व गाळप हंगाम किमान किती दिवस कारखाना चालल्यास आर्थिक दृष्ट्या सक्षम राहील यावर सखोल अभ्यास करून अहवाल सादर करावा.

प्रस्तूत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २०२६०७२७१८०२४५१६४७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.07.27 18:03:59 +05'30'

(अंकुश पां. शिंगाडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी :-

१) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहाय्य, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई.
८) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे.
१०) निवडनस्ती २५-स